# उपजिल्हाधिकारी(रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा यांचे कार्यालय.
## प्रशासकीय भवन,सिव्हील लाईन,सेवाग्राम रोड,वर्धा

दुरध्वनी क्रमांक ०७१५२-२४३२४९

Email-dycollwardha@mahmgnrega.com


**जाहिरात**

क्रमांक कक्ष फ//रोहयो/कावि- /२०१६
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.
दिनांक :- ४ जानेवारी २०१६

## पा हि जे त

### तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsperson)

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना सर्व साधारण जनतेकडून प्राप्त होणा-या तक्रारीचा निपटारा करणे व योजनेच्या कामात पारदर्शकता राखण्यांकरीता उपाययोजना सुचविणे यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ च्या (६ ऑगष्ट,२०१४ पर्यंत सुधारीत )अनुसूची-२ मधील कलम-२९ नुसार वर्धा जिल्हयाकरीता तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsperson) यांची नेमणूक करावयाची आहे.

**किमान पात्रता** :-

1) केन्द्र शासनाचे क्रमांक L११०११/२१/२०१२/RE-VII दिनांक १६.१.१४ रोजीच्या मार्गदर्शक सुचनांच्या निकषानुसार पात्र उमेदवार असावा.
2) उमेदवारास लोकप्रशासन/विधी/ सामाजिक कार्य/शैक्षणिक किंवा व्यवस्थापन क्षेत्रातील किमान वीस वर्षाचा अनुभव असावा.उमेदवार सबंधित जिल्हयातील रहिवासी असावा.
3) उमेदवाराचे वय दिनांक १ एप्रील २०१५ रोजी ६८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
4) उमेदवार राजकीय पक्षाशी सबंधित नसावा.
5) उमेदवार शारिरिकदृष्टया सुदृढ तसेच जिल्हयातील अती दुर्गम भागात दौरे,निरीक्षण करण्यांस सक्षम असावा.

**कालावधी व मानधन**:-

1) या पदावरील नियूक्तीचा कार्यकाल दोन वर्षाचा असेल तथापी,कामगिरी समाधानकारक नसल्यांस नियूक्ती रद्द करण्यांत येईल.
2) त्यांचे कार्यालय सबंधित जिल्हयाचे मुख्यालयाच्या ठिकाणी असेल.
3) शासन परिपत्रक क्र.२०१३/प्र.क्र.१६५/रोहयो ६ अ दिनांक १४.८.२०१३ रोजीच्या मार्गदर्शक सुचनानुसार तक्रार निवारण प्राधिकारी यांना प्रती बैठक

रु.१०००/- या दराने (कमाल रु.२००००/- प्रति माह दराने मर्यादीत) मानधन देण्यात येईल.

4) तक्रार निवारण प्राधिकारी **(Ombudsperson) या** पदाची तपशिलवार माहिती,नियूक्तीच्या अटी/शर्ती व अर्जाचा नमूना,केन्द्र शासनाच्या दिनांक १६ जानेवारी,२०१४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनाव्दारे निश्चित करण्यांत आल्या असून त्याची प्रत केन्द्र शासनाच्या www.nrega.nic.in या संकेतस्थळावर तसेच उपजिल्हाधिकारी (रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

इच्छुक उमेदवारानी स्वतःची शैक्षणिक अर्हता व अनुभवा सबंधिच्या प्रमाणपत्रासह जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्या नांवाने अर्ज तयार करावा व सदर अर्ज उपजिल्हाधिकारी (रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा यांचे कार्यालयात दिनांक ११ जानेवारी १६ रोजी सायंकाळी ५-३० वाजेपर्यंत सादर करावा.उशिराने प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.उपजिल्हाधिकारी (रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा यांचे कार्यालयात प्राप्त होणा-या अर्जाची छाननी करण्यांत येईल व छाननीअंती प्राप्त झालेल्या अर्जाची नांमाकने मूळ कागदपत्रासह खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे शासनास सादर करण्यांत येतील.

या प्रक्रीयेकरीता प्राप्त होणा-या अर्जापैकी कोणतेही कारण न देता विशिष्ट अर्ज किंवा सर्व अर्ज रद्द करण्यांचे अधिकार राखुन ठेवण्यांत येत आहेत.

**(मुळ प्रत मा.जिल्हाधिकारीव्दारा अनुमोदीत)**

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक,**
**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**
**जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा करिता**